गुरुवार, दिनांक २८ जानेवारी, २०२१

RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार

वर्ष ६, अंक २६(३)] बुधवार, सप्टेंबर १६, २०२०/भाद्र २५, शके १९४२ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक ४१

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४.— महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.	**पृष्ठे** (१-२)

दिनांक १५ सप्टेंबर २०२० रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

भूपेन्द्र मु. गुरव,
प्रभारी सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४.

(माननीय राज्यपालांनी संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक १६ सप्टेंबर २०२० रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

२०१७ चा महा. ६. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक २०२० चा महा. अध्या. ९. २५ जून २०२० रोजी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०२०, हा प्रख्यापित केला होता;

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :-

संक्षिप्त नाव व प्रारंभ

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अधिनियम, २०२० असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २५ जून २०२० रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन २०१७ चा अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १०९ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम १०९ मधील,— २०१७ चा महा.६.

(१) पोट-कलम (३) मध्ये, खंड (छ) मधील विद्यमान परंतुकानंतर, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईलः—

" परंतु आणखी असे की, शैक्षणिक वर्ष, २०२०-२०२१ साठी, व्यवस्थापनाकडून प्राप्त झालेले अनुपालन अहवाल राज्य शासनास सादर करण्याची तारीख आणि शैक्षणिक वर्ष, २०२०-२०२१ साठी, शासनाने नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यास अंतिम मान्यता देण्याची अखेरची तारीख, वाढविण्याच्या दृष्टीने, यातील तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, पोट-कलम (३) च्या खंड (च) व (छ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या तारखा या, उक्त तक्त्याच्या स्तंभ (३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे वाचण्यात येतील :—

खंड	विद्यमान तरतुदीमधील तारीख	शैक्षणिक वर्ष, २०२०-२१ साठी तारीख
(१)	(२)	(३)
(च)	१ मे रोजी किंवा त्यापूर्वी	३० जून २०२० रोजी किंवा त्यापूर्वी
(छ)	१५ जून रोजी किंवा त्यापूर्वी	३१ जुलै २०२० रोजी किंवा त्यापूर्वी." ;

(२) पोट-कलम (४) मध्ये, खंड (घ) मधील विद्यमान परंतुकानंतर, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईलः—

" परंतु आणखी असे की, शैक्षणिक वर्ष, २०२०-२०२१ साठी, राज्य शासनास, त्यास योग्य व उचित वाटेल अशा परिसंस्थेसाठी नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्या, इत्यादी सुरू करण्यासाठी ३१ जुलै २०२० रोजी किंवा त्यापूर्वी परवानगी देता येईल.".

सन २०२० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ याचे निरसन व व्यावृत्ती.

३. (१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०२० हा याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०२० चा महा. अध्या. ९.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

RNI No. MAHENG /2009/35528

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग आठ

वर्ष ६, अंक ३४(३)] बुधवार, सप्टेंबर १६, २०२०/भाद्र २५, शके १९४२ [पृष्ठे २, किंमत : रुपये २७.००

असाधारण क्रमांक ७४

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद)

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Public Universities (Amendment) Act, 2020 (Maharashtra Act No. XXIV of 2020), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

BHUPENDRA M. GURAO,
I/c. Secretary (Legislation) to Government,
Law and Judiciary Department.

MAHARASHTRA ACT No. XXIV OF 2020.

(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 16th September 2020).

An Act further to amend the Maharashtra Public Universities Act, 2016.

WHEREAS both Houses of the State Legislature were not in session ;

Mah. VI of 2017.

Mah. Ord. IX of 2020.

AND WHEREAS the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Public Universities Act, 2016, for the purposes hereinafter appearing ; and, therfore, promulgated the Maharashtra Public Universities (Amendment) Ordinance, 2020, on the 25th June 2020 ;

AND WHEREAS it is expedient to replace the said Ordinance by an Act of the State Legislature ; it is hereby enacted in the Seventy-first Year of the Republic of India as follows :—

Short title and commencement.

1. (*1*) This Act may be called the Maharashtra Public Universities (Amendment) Act, 2020.

(2) It shall be deemed to have come into force on the 25th June 2020.

Amendment of section 109 of Mah. VI of 2017.

2. In section 109 of the Maharashtra Public Universities Act, 2016 (hereinafter referred to as "the principal Act"),— Mah. VI of 2017.

(1) in sub-section (*3*), in clause (g), after the existing proviso, the following proviso shall be inserted, namely :—

"Provided further that, for the academic year 2020-2021, with a view to extend the date of forwarding the compliance reports received from management to the State Government and the last date to grant the final approval to start the new College or Institution by the Government, for the academic year 2020-2021, the dates referred to in clauses (*f*) and (*g*) of sub-section (*3*), as specifted in column (2) of the Table hereto, shall be read as provided in column (3) of the said Table :—

Clauses	Date in existing provision	Date for Academic Year 2020-21
(1)	(2)	(3)
(f)	On or before 1st day of May	On or before 30th June 2020
(g)	On or before 15th June	On or before 31st July 2020.";

(2) in sub-section *(4)*, in clause (*d*), after the existing proviso, the following proviso shall be inserted, namely :—

"Provided further that, for the academic year 2020-2021, the State Government may grant permission to start the new course of study, subjects, faculties, additional divisions, etc. on or before 31st July 2020 to such Institution as it may consider fit and proper.".

Repeal of Mah. Ord. IX of 2020 and saving.

3. *(1)* The Maharashtra Public Universities (Amendment) Ordinance, 2020 is hereby repealed. Mah. Ord. IX of 2020.

(*2*) Notwithstanding such repeal, anything done or any action taken (including any notification or order issued) under the corresponding provision of the principal Act, as amended by the said Ordinance, shall be deemed to have been done, taken or issued, as the case may be, under the corresponding provisions of principal Act, as amended by this Act. Mah. VI of 2017.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.